# गिरिमित्र संमेलन

## महाराष्ट्र सेवा संघ

नोंदणी क्रमांक. एफ ४०२०, स्थापना १९३७,

पंडीत जवाहरलाल नेहरू मार्ग, मुलुंड (पश्चिम) मुंबई -४०० ०८०, दूरध्वनी : (०२२) २५६८१६३१

Girimitra Sammelan, Maharashtra Seva Sangh, J. N. Marg, Mulund (W), Mumbai 80, Tel. 022 - 25681631


नमस्कार गिरिमित्रानो,

११ वर्षापूर्वी मुलुंडच्या महाराष्ट्र सेवा संघाने आपल्यासारख्या दऱ्या डोंगरात भटकणायांना एक व्यासपीठ मिळवून दिले. खरे तर सेवा संघाच्या आजवरच्या उपक्रमांत गिर्यारोहणाचा समावेश कधीच नव्हता. पण गिर्यारोहण हा निव्वळ साहसी प्रकार नसून त्यालाही एक सामाजिक संस्थामक अधिष्ठान आहे याची जाणीव सेवा संघाला झाली. एक वेगळे समाजमन गिर्यारोहणातून तयार होते, आपल्या चांगल्या वाईट वागण्याचा प्रभाव समाजावर नक्कीच पडतो. हे त्यांनी ओळखले कारण सेवासंघ स्वत:च एक उत्तम सामाजिक सांस्कृतिक संघटना आहे. आज सेवा संघ कारकिर्दीची ७५ वर्षांचा टप्पा ओलांडत आहे. समाजात त्यांना एक वेगळी ओळख आहे, स्थान आहे. त्यानिमित्ताने आपणदेखील समाज आणि गिर्यारोहण हे संबध तपासून पाहणार आहोत.

डोंगरात भटकणे, कडे सुळक्यांवर आरोहण करणे, हिमशिखरे सर करणे हा काही समाजातील लोकप्रिय छंद नाही कि टीआरपी वाढविणारा प्रकार देखील नाही. आपल्या डोंगर भटकंतीलादेखील अनेक पैलू आहेत. कोणी आनंदासाठी भटकतो, कोणी साहसासाठी, कोणी इतिहासाचा मागोवा घेत तर कोणी निसर्गाच्या प्रेमात पडून डोंगररांगा पालथ्या घालत असतो. आज आपला डोंगरवेडा समाज वाढतोच आहे. किंबहुना तो गेल्या काही वर्षात तो कैक पटीने वाढला आहे. आज अर्धशतकाहून अधिक काळ झाला, डोंगर भटक्यांची किमान चौथी पाचवी पिढी कार्यरत आहे. सर्वोच्च हिमशिखरावर तर यंदा महाराष्ट्रातल्या एक डझन गिर्यारोहकांनी यशस्वी आरोहण केले. हे सारेच काही निव्वळ भटकणे नाही. यातून निश्चितच एक समाजमन घडत असते.

तरीदेखील समाजाचा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा मात्र बऱ्याच अंशी हेटाळणीच्या स्वरुपाचा असतो. कशाला मरायला हे त्या डोंगरात जातात, उगाच जीव धोक्यात घालतात, काय मिळते तेथे त्यांना, त्यापेक्षा घरची चार कामे करा, गल्लीतली समाजसेवा करायचे सोडून ते किल्ले कशाला साफ करताय वैगरे वैगरे. हे सारे आपणास अगदी हमखास ऐकायला मिळते. अर्थातच आपणास या साऱ्याची अगदी व्यवस्थित सवय झालेली असते. पण कधी खरेच आपण विचार करतो का या प्रश्नांचा, विचारणाऱ्याचा रोख काय असतो, त्याला आणखीन काही वेगळे अपेक्षित आहे का. आपल्या या साऱ्या उडानटप्पूपणाला (जगाच्या मते) खरेच काही अर्थ आहे का?

हो नक्कीच आहे. गिर्यारोहणाचे फायदे तोटे सांगायचे म्हणून नाही पण आपली भटकंती स्वच्छंदी मुक्त असली तरी या सर्वाला एक अदृश्य अशी फ्रेम नक्कीच असते. स्वत:ची आणि अनुषंगानेच गिर्यारोहणाची एक प्रतिमा आपण तयार केली आहे. महत्वाचे म्हणजे समूहाने एखादे काम करण्याचा एक चांगला परिपाठ आपण घालून दिलेला आहे. त्यातूनच स्वत: बरोबर समाजाचा देखील विकास साधण्याचा आपला हेतू असतो. अर्थात तो जगभर आपण सांगत फिरत नाही. आपला डोंगर भटक्यांचा एक वेगळा समाजच आहे, जो समाजात आपले एक स्थान बनवून आहेत. अर्थात आपली उज्वल परंपरा या साऱ्या मागे आहेच. म्हणूनच समाजाचे आणि आपले नेमके परस्पर संबध जोखण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. त्यासाठी ११ व्या गिरिमित्र संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना आपण ठरवली आहे, **गिर्यारोहण – समाजाचा दृष्टीकोन.**

११ वे गिरिमित्र संमेलन महाराष्ट्र सेवा संघ, आणि कालिदास नाट्य मंदिर मुलुंड येथे दिनांक १४ व १५ जुलै रोजी होणार आहे. दीड दिवसाच्या या समारंभात नेहमीप्रमाणे अनेक उपक्रमची रेलचेल करण्यात आली आहे.

**१. गिरिमित्र सन्मान प्रदान सोहळा**
**२. मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित कार्यक्रम**
**३. इतर राज्यातील प्रतिनिधींचे सादरीकरण**
**४. प्रश्नमंजुषा**
**५. कृत्रिम प्रस्तरभिंत आरोहण**
**६. ट्रेकर्स ब्लॉग स्पर्धा**
**७. छायाचित्रण स्पर्धा**
**८. दृकश्राव्य सादरीकरण स्पर्धा**
**९. गिर्यारोहण साहित्य दालन**
**१०. एव्हरेस्टवीरांचा सत्कार**

या पत्राद्वारे ११ व्या गिरिमित्र संमेलनात सहभागी होण्यासाठी आम्ही आपणास आमंत्रित करीत आहोत. संमेलनाचे आयोजन, कार्यक्रम व स्पर्धांमध्ये आपला सक्रीय सहभाग स्वागतार्ह आहे. संमेलनात सहभागी होण्यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. मागील वर्षी दशकपूर्ती संमेलन असल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात आपण हे संमेलन षण्मुखानंद सभागृहात घेतले होते. यंदा तेवढ्या मोठ्या प्रमाणात नसले तरी जास्तीत जास्त डोंगर भटक्यांना सामावून घेण्याच्या दृष्टीने कालिदास नाट्यगृह मुलुंड येथे संमेलन संपन्न होणार आहे.

कृत्रिम प्रस्तरभिंत आरोहण, ट्रेकर्स ब्लॉग स्पर्धा, गिर्यारोहण साहित्य दालन, प्रश्नमंजुषा असे काही नाविन्यपूर्ण उपक्रम यंदाच्या संमेलनात सादर केले जाणार आहेत. छायाचित्रण स्पर्धा संपूर्णत: ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. संमेलन पूर्व संध्येला नेहमीप्रमाणे एका खास कार्यक्रमात आपले विशेष अतिथी व ज्येष्ठ गिर्यारोहक यांच्याशी संवाद साधता येणार आहे.  तसेच इतर राज्यातून आलेल्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करता येणार आहे. पूर्व संध्येचा हा कार्यक्रम महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड येथे १४ जुलै रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० या दरम्यान आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश दिला जाईल.

यंदाचे वर्ष हे महाराष्ट्र सेवा संघाचे अमृत महोत्सवी वर्ष. त्यामुळे संमेलनाचे यजमानपद सेवासंघ सांभाळणार आहे. मागील आठ वर्षातील संस्था सहआयोजक आहेतच, पण त्याबरोबरच यशवंती हायकर्स, शैलभ्रमर आणि ऑफ बिट सह्याद्री या संस्था देखील यंदा सह आयोजकाच्या भूमिकेत राहणार आहेत.

संमेलनात सहभागी होण्यासाठी प्रवेश अर्ज, विविध स्पर्धांची माहिती सोबत जोडली आहे.

आपली उपस्थिती, सहकार्य अन सहभाग यांच्या अपेक्षेसह.

**श्री चंद्रशेखर वझे,**
**अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ**

**श्री चंद्रशेखर कुलकर्णी,**
**संमेलन प्रमुख, ११ वे गिरिमित्र संमेलन**

**सह आयोजक संस्था :**
**१) पिनॅकल क्लब  २) चक्रम हायकर्स  ३) गिरीविहार  ४) ट्रेकक्षितिज  ५) यंग झिंगारो  ६) नेचर लव्हर्स**
**७) निसर्गमित्र  ८) युथ हॉस्टेल  ९) यशवंती हायकर्स  १०) शैलभ्रमर  ११) ऑफ बीट सह्याद्री**

माहितीपत्रक, स्पर्धांच्या प्रवेशिका यासाठी खालील वेब साईट पहा अथवा मेल पाठवा.
Website: www.girimitra.org  Email : girimitra.sammelangmail.com

**संपर्कासाठी नाव व पत्ते:**
**१. महाराष्ट्र सेवा संघ :** जवाहरलाल नेहरू मार्ग, अपना बाजारचे वर, मुलुंड (प) मुंबई, ४०० ०८० दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१, वेळ : सोम ते शनी सकाळी १०.३० ते ७.३० व रविवारी सकाळी १०.३० ते १२.३०

**२. गिरीविहार :** श्री दिलीप लागू, सी / १०२, कोहिनूर अपार्टमेंट, टायटन शोरूम, एन सी केळकर मार्ग, दादर (प) मुंबई ४०० ०२८ दूरध्वनी : ०२२- २४३१५५९७

**३. युथ हॉस्टेल :** १०९ स्वप्नपूर्ती, डॉ. बी ए रोड, परेल (पु) मुंबई ४०० ०१२ दूरध्वनी : ०२२-२४१२६००४

**सूचना :**
मुंबई बाहेरील प्रतिनिधींची १४ जुलै २०१२  रोजी राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड येथे करण्यात आली आहे. त्यासाठी पूर्व सूचना देणे आवश्यक आहे.

# परिशिष्ट

## द्रुकश्राव्य सादरीकरण स्पर्धा:

विषय: गिर्यारोहण, दुर्गभ्रमण, निसर्गावलोकन

ग्राह्य प्रवेशासाठी: विषयाला अनुसरून ३५ मिमी पारदर्शिका, चित्रफिती, पॉवर पॉइंट सादरीकरण इ.

कालमर्यादा: १५ मिनटे    अंतिम तारीख: २० जून २०१२

संपर्क: जितेंद्र अष्टेकर – ९९६९१९४४२२    रमेश कुलकर्णी – ९८२०८८१८१८    प्रसाद जोशी – ९२२२६३०००२/ ९९२०८०६६९९

## द्रुकश्राव्य सादरीकरण – नवीन उपक्रम

विषय: गिर्यारोहण, दुर्गभ्रमण, दुर्ग संवर्धन – या संदर्भातील नवीन उपक्रमावर आधारित निवडक सादरीकरणे संमेलनात दाखविली जातील. यात स्पर्धा नसेल, पण विषयाची व्याप्ती, खोली व नाविन्य यानुसार निवडक सादरीकरणे संमेलनात दाखविली जातील.

ग्राह्य प्रवेशासाठी: विषयाला अनुसरून ३५ मिमी पारदर्शिका, चित्रफिती, पॉवर पॉइंत सादरीकरण इ.

कालमर्यादा: ८ – १० मिनटे    अंतिम तारीख: २० जून २०१२

संपर्क: जितेंद्र अष्टेकर – ९९६९१९४४२२    रमेश कुलकर्णी – ९८२०८८१८१८    प्रसाद जोशी – ९२२२६३०००२/ ९९२०८०६६९९

## ट्रेकर्स ब्लॉग स्पर्धा:

आजकाल कोणी फारसे लिहित आणि कोणी फारसे वाचत देखील नाही अशी सरसकट चर्चा सर्वत्र आढळते. पण नव्या पिढीतील ट्रेकर्स नव्या तंत्रज्ञाच्या साथीने आपले अनुभव इंटरनेटच्या माध्यमातून ब्लॉगद्वारे लिहत आहेत. फार मोठी संख्या नसली तर ट्रेकिंगवर सुमारे ३० एक ब्लॉग तरी आज मराठीत आहेत. त्यामुळेच या नव्या युगाच्या नव्या माध्यमाला चालना द्यावी आणि एक व्यासपीठ मिळवून द्यावे या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात येणार आहे.

विषय: पदभ्रमंती, गिरिभ्रमंती, दुर्ग, दुर्गभ्रमंती, प्रस्तरारोहण, हिमालयन भ्रमंती, पर्वतारोहण

भाषा: मराठी

स्पर्धेसाठी लिखाणाचा ग्राह्य कालावधी: ब्लॉग स्पर्धेची हि पहिलीच वेळ असल्यामुळे, परीक्षणाच्या तारखेपर्यंत जे काही लिखाण ब्लॉगवर असेल ते सर्व लिखाण ग्राह्य धरले जाईल. (पुढील वर्षापासून कालावधीची मर्यादा असेल)

निकष: विषय मांडणी, भाषा, ताजेपणा, लिखाणातील तांत्रिक अचूकता,

अंतिम दिनांक: ३० जून २०१२

संपर्क: Suhas Joshi - 9833068140

## स्मरणिका :

नेहमीप्रमाणे यामध्ये महाराष्ट्रातील गिर्यारोहण संस्थांची माहिती आपण देणार आहोत. त्यासाठी आपल्या गिर्यारोहण संस्थेचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ–मेल, संकेतस्थळ (वेब साईट), इ माहिती पाठवावी.

संपर्क: वसंत घाग – ९७६९२००११२

स्मरणिकेसाठी मध्यवर्ती संकल्पनेस अनुसरून लेख पाठवू शकता.

दरवर्षी स्मरणिकेसाठी हेल्पलाईन, किल्ला, डोंगर परिसरातील एस टी स्थानक, रेल्वे स्थानक, पोलीस स्टेशन, ग्रामस्थ, सर्पमित्र इ माहिती मागवली जाते. पण आपण जर हि माहिती पाठवली असती तर आज एक चांगला डेटाबेस तयार झाला असता आणि इतर डोंगरमित्रांना देखील आपल्याकडील माहिती मिळाली असती. एकंदरीतच आपल्याकडील माहिती आपल्याकडेच रहावी अशीच सर्वांची इच्छा असल्याचे जाणवते. त्यामुळे यावर्षीपासून या संदर्भात आवाहन करणे बंद करीत आहोत.

### छायाचित्रण स्पर्धा:

मागील वर्षी प्रमाणेच यंदाही छायाचित्रण स्पर्धा हि संपूर्णत: ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. यावर्षी विषयांमध्ये काहीसा बदल करण्यात आला आहे. यंदा काही ठराविक विषय निवडून त्यावर आधारित विभाग करण्यात आले आहेत.

१. गडावरील वास्तू    २. प्रस्तरारोहण    ३. Himalayan Expedition

सविस्तर माहिती पत्रकासाठी www.girimitra.org या वेबसाईटला भेट द्यावी.

### महाराष्ट्र बाहेरील राज्यातील डोंगर भटकंतीच्या संधी:

यासंदर्भात आयोजकांकडून विविध राज्यातील गिर्यारोहण संस्थांशी संपर्क साधला जात आहेच. आपणास काही नाविन्यपूर्ण माहिती असेल (इतर राज्य संदर्भात) तर जरूर कळवावी..

संपर्क: मुकेश मैसेरी: ९८६९०२१६२१    अभिजित बर्मन (बॉग) ९८६९६१५१६६

### प्रश्नमंजुषा :

सविस्तर माहिती पत्रकासाठी www.girimitra.org या वेबसाईटला भेट द्यावी.

# ENROLLMENT FORM FOR PARTICIPANT

11th Girimitra Sammelan, 15th July 2012

***Name:** ____________________________________________

***Organisation:** ____________________________________________

***Address:** ____________________________________________

____________________________________________

____________________________________________

***Contact:** **Res.:**___________________ ***Cell:**_____________________

***Email:** ____________________________________________

**Blood Group:**____________ **Date of Birth:** ______________

***Date:** _________ ***Signature:** _________

**Participant Please Note:**
Fields which are marked with * are compulsory.
If the * marked field are not filled, form will not be acceptable for participation.

**Collection Centre Please Note:**
Please do not accept form if the * marked fileds are not filled.